**जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी (महाराष्ट्र शासन), यांनी प्रस्तावित केलेल्या परभणी जिल्हयातील परभणी, मानवत, सेलू, गंगाखेड, पुर्णा, सोनपेठ, पालम, पाथरी व जिंतुर या तालुक्यातील ५८ प्रस्तावित असलेल्या वाळूघाटाच्या संदर्भात दिनांक ०१/०२/२०२४ रोजी सकाळी ११:०० वा. जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्तांत :**

..........................................................................................................................

..

जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी (महाराष्ट्र शासन), यांनी प्रस्तावित केलेल्या परभणी जिल्हयातील **परभणी, मानवत, सेलू, गंगाखेड, पुर्णा, सोनपेठ, पालम, पाथरी व जिंतुर** तालुक्यातील ५८ प्रस्तावित असलेल्या वाळूघाटाच्या संदर्भात दिनांक ०१/०२/२०२४ रोजी सकाळी ११:०० वा. जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी येथे पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यात आली.

जाहीर लोकसुनावणीसाठी खालील समिती सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **रघुनाथ गावडे,**<br>जिल्हादंडाधिकारी, परभणी. | : | अध्यक्ष |
| २ | **सुजित ढोलम,**<br>प्रादेशिक आधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, छत्रपती संभाजीनगर. | : | सदस्य |
| ३. | **श्रीपाद कुलकर्णी**<br>उप-प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, परभणी | : | संयोजक |

परभणी जिल्हयातील परभणी, मानवत, सेलू, गंगाखेड, पुर्णा, सोनपेठ पालम व जिंतुर तालुक्यातील प्रस्तावित असलेल्या वाळूघाटाच्या पर्यावरण विषयक मंजूरीसाठी जाहीर लोक सुनावणीसाठी मा. जिल्हादंडाधिकारी, परभणी यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०१ फेब्रूवारी २०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय परभणी येथे आयोजित करण्यात आली

.

श्रीपाद कुलकर्णी, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ परभणी तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करुन जनसुनावणी समिती अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक

जाहीर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना थोडक्यात विषद केली. भारत सरकार, पर्यावरण व वने मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अधिसुचना क्रं. एस.ओ.१५३३ दि. १४/०९/२००६ (दि. ०१/१२/२००९ सुधारित) नुसार सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरण विषयक सुचना, विचार, टिका टिप्पणी आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर लोकसुनावणीचे आयोजन केले असल्याचे नमूद केले. तसेच जिल्हा खनिकर्म अधिकारी, परभणी यांचा, परभणी जिल्हयातील वाळू घाटाबाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यासाठी रितसर अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दि. २७/१२/२०२३ रोजी प्राप्त झाला होता. त्याअनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, परभणी यांनी सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी येथे घेण्याबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने आजची जाहीर लोक सुनावणी घेण्यात येत आहे असे नमूद केले. सदर बाबतची जाहीर सुचना दि. ३१/१२/२०२३ रोजीच्यो दै. सकाळ (मराठी) व द टाईम्स ऑफ इंडीया (इंग्रजी) या वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित करण्यात आली होती. सदर वाळूघाटांच्या परिसरामधील रहिवाशी, पर्यावरण विषयी काम करणा-या संस्था, विस्थापित होणारे किंवा अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सुचना, आक्षेप इत्यादी लेखी स्वरुपात ३० दिवसांपर्यंत उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, परभणी येथे लिखीत स्वरूपात वा इमेलद्वारे पाठविण्याबाबत नमुद करण्यात आले होते.

सदर प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजना व कार्यकारी सारांश (मराठी व इंग्रजी) इत्यादी दस्तऐवज मध्ये खालील कार्यालयामध्ये उपलब्ध करुन देण्यात आले होते.

- जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी.
- जिल्हा उदयोग केंद्र, परभणी.
- जिल्हा परिषद, परभणी.
- तहसिलदार, तहसिल कार्यालय परभणी, मानवत, सेलू, गंगाखेड, पुर्णा, सोनपेठ, पालम, पाथरी व जिंतुर
- ग्रामपंचायत कार्यालय - वांगी, राजुरा, टाकळी निलवर्ण, सावंगी मगर, कोथाळा, शेवडी जाहांगीर, रामपुरी बु, पारडी टाकळी, ता. मानवत. नांदगांव खुर्द, ता. परभणी, सातेगांव, देवठाणा, मिठापुर, धनगर टाकळी, कंठेश्वर, खरबडा, पिपंळगांव सारंगी, निळा, कानखेड, ममदापुर, सुकी, पिंपळगाव बा., संदलापुर ता. पुर्णा, सावळी बु., निलज, गणेशनगर, वझर बु., पिंपळगाव गायके, ता. जिंतुर. आनंदवाडी अंतर्गत महातपुरी, महातपुरी, गौडगांव, चिंचटाकळी, मुळी, धारखेड, झोला, मसला, नागठाणा, ता. गंगाखेड, खादगांव, सोन्ना, दिग्रस बु., आंबेगाव, ता. सेलु. राहाटी, फळी, रावराजुर, धनेवाडी, फरकंडा, बरबडी, सावंगी थडी, सारंगी भु., गुंज, भोगाव, दुटका, ता. पालम. खडका/मोहळा, लासीना, थडी पिंपळगांव, ता. सोनपेठ. डाकु पिंपरी, ता. पाथरी.
- उप-प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, परभणी.

- प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, छत्रपती संभाजीनगर.
- मुख्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ मुंबई.
- पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
- प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नागपूर.

श्री. श्रीपाद कुलकर्णी, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ परभणी तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी सांगितले की, जर कूणाला सदर प्रकल्पासंबंधी पर्यावरण विषयक काही विचार, सुचना टिप्पणी, इ. नोंदवायचे असतील तर ते इथे सूध्दा आज मौखीक अथवा लिखित स्वरूपात नोंदवू शकतात. प्रश्न फक्त पर्यावरण विषयकच विचारले जावेत अशी त्यांनी विनंती केली. जेणेकरून प्रकल्प प्रवर्तकातर्फे समाधानकारकरित्या योग्य मार्गदर्शन केले जाईल व शंकांचे निरसन केले जाईल व त्याची इतिवृतामध्ये नोंद घेतली जाईल आणि सदर जाहीर लोकसूनावणीच्या चित्रफितीसहीत ते पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन येथे पूढिल योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर करण्यात येईल. त्यानंतर सदर जाहीर लोकसूनावणीचे अध्यक्षांच्या परवानगीने, प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्यास विनंती केली.

त्यास अनुसरुन प्रकल्पाचे मे. महाबळ एन्व्हायरो इंजिनीयर्स प्रा. ली., प्रकल्प सल्लागार यांचेमार्फत श्रीमती वैष्णवी रामटेके, यांनी प्रकल्पाबददल विविध मुदयांवर सादरीकरण केले ज्यामध्ये प्रस्तावित वाळुघाटांचा तपशील, खानकाम पदधती, पर्यावरण व्यवस्थापन योजना इत्यादीचा समावेश होता. त्यांनी पूढे सांगितले की, परभणी जिल्हयातील परभणी, पाथरी, मानवत, सोनपेठ, जिंतूर, सेलू, गंगाखेड, पालम व पूर्णा तालुक्यात प्रस्तावित असलेल्या वाळूघाटासाठी पर्यावरणविषयक मंजूरीसाठी अर्ज करण्यात आला आहे. वाळु उत्खननाठी कुदळ, फावडे, घमेले यासारख्या साधनांचा उपयोग केला जाईल. केवळ कोरडया नदीपात्रातून वाळू उत्खनन केले जाईल. कूठल्याही मशिनरीचा वापर केला जाणार नाही. वायू प्रदूषण नियंत्रणासाठी वाळू वाहतुकीसाठी वापरल्या जाणा-या कच्च्या रोडवर नियमित पाणी शिंपडले जाईल. फक्ता टॅक्टर ट्रॉली द्वारे नदीपात्रातून वाळूची वाहतूक ताडपत्रीने झाकुन करण्यात येईल. ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी खाणकाम आणि वाळू वाहतुक केवळ दिवसाच्या वेळीच केली जाईल. जल प्रदूषण नियंत्रणासाठी वाळू उत्खनन केवळ कोरडया नदीच्या पात्रातच केले जाईल. पावसाळयात आणि पूरात उत्खनन टाळले जाईल यामुळे वाळू उपसा पुन्हा भरु शकेल. जमीनीचे पर्यावरण समतोल राखण्यासाठी खाणकाम परवानगी घेण्याच्या क्षमतेपेक्षा जास्त होणार नाही, नदीकाठ आणि जवळपास मोकळया जागांवर वृक्षारोपन विकसित केले जाईल. पर्यावरणाची हानी होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

परभणी, मानवत, सेलू, गंगाखेड, पुर्णा, सोनपेठ, पालम, पाथरी व जिंतुर तालुक्यातील वाळुघाटाची माहिती खालील प्रमाणे आहे.

**<u>तालुका परभणी-</u>**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र हे. | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | नांदगाव खुर्द | ३६२,३६३,३६८,३७०, ३७१,३७२ | ५००x४०x२.५० | २.०० | ४०२८ |

**<u>तालुका मानवत-</u>**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र हे. | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | वांगी | १२, १३, १४, १५, १६, १७, १८, १९, ०८,०९, १०, ५१, ५२,५३, ५४ | ७००x६०x१.०० | ४.२० | ७४२० |
| २ | राजुरा | १, २ | ६५०x१६x१.०० | १.०४ | २२६१ |
| ३ | टाकळी निलवर्ण | १७६, १७७, १७८, १८०, १९०, १९१, २०६/१, २०६/२, २०७, २१०, २११ | ५००x२०x०.५० | १.०० | १७६७ |
| ४ | सावंगी मगर | १, २, ९, १३, १४,१७१, १७२ | ५००x२०x०.५० | १.० | १७६७ |
| ५ | कोथाळा | १९५, १९६, १५१, १९७, १९८ | ४००x२५x०.५० | १.० | १४१३.४२ |
| ६ | शेवडी जहांगीर | ७१ ते ७९, ८१, ८३, ८४, ९० | ५००x२०x०.५० | १.० | १७६७ |
| ७ | रामपुरी बु | ४५४, ४५५, ४५८, ४५९, ४६८, ४७४, ४७५, ४७८, ४७९, ४८० | ९००x५०x१.०० | ४.५० | ७९५१ |
| ८ | पारडी टाकळी | ३५, ३६, ४५, ४६, ४७, ४९, ५१, ५२, ५३, ९१, ९२, ९३, ९४, ९५, ९६, ९७ | ५००x२०x०.५० | १.० | १७६७ |

**तालुका पुर्णा -**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र हे. | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | सातेगाव | ४८,५५,५४,५३,५२,५१ | ३४०x५०x०.५० | १.७० | ३००३ |
| २ | देवठाणा | ७६, १६७, १६८, १६९, १७० | २९५x९३x१.०० | २.७४ | ४८४७ |
| ३ | मिठापुर | १५, १६, १७, १८ , १९, २० | ३५०x५५x१.०० | १.९२ | ३४०१ |
| ४ | धनगर टाकळी | ८, १३, १४, १५, १६, १७, २१, २२, २५, २६, २७, २८, २९, ३१, ३२, ३६, ३९, ४० | ४००x४५x१.०० | १.८० | ३१८० |
| ५ | कंठेश्वर | ३, १८६, १८७, २१७, २२१ | २००x५५x१.०० | १.१० | १५५४ |
| ६ | वझुर | २२८, २३२, २३६, २४२, २४६, | ४००x६५x१.०० | २.६० | ४५९३ |
| ७ | खरबडा | २४६ ते २५०, २४२, २४०, २२९, २३४ | ३७५x६५x१.०० | २.४३ | ३४४५ |
| ८ | पिंपळगांव सारंगी | २०, २१, २२, ११७, ११२, १११, ११०, १०८, १०२, १०१, ९७ | ३४५x५५x१.०० | १.८९ | ३३५२ |
| ९ | निळा | ८१, ७३, ६, ७, ८ ,९, १०, १६, १७,२३, २४, २७ | ५५०x६०x०.७० | ३.३० | २९१५ |
| १० | कानडखेड | ६९८, ६९९, ७००, ७१५, ५५२, ५४३, ५४२, ५४१, ३२४, ३२९, ३२५, २३०, २३२, २३३, १, ८, ९ | ६३०x६०x१.०० | ३.७८ | ६६७८ |
| ११ | ममदापुर | १४, १५, १६, १८, १९, २०, २१ | २६०x५०x१०० | १.३० | २५०० |
| १२ | सुकी | १५५, १५६, १९२, ते १९७ | ८००x४५x१.०० | ३. ६० | ३१८० |
| १३ | पिंपळगाव बा. | १४४, १४९, १३६, १३३, १५० ते १५६ १९२ ते १९६ | ८००x५०x१.०० | ४.०० | ७०६७ |
| १४ | संदलापुर | ६, ७, ८, ९, १०, | ५००x५०x१.०० | २.५० | २२०८ |

**तालुका जिंतुर -**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र हे. | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | सावळी बु | ६२,६३,६४,७०,७१,९७ | २००x५०x२.५० | १ | १७६६ |
| २ | निलज | १६,१८,२०,२२,२५,२६ | २००x५०x१.५० | १ | १७६६ |
| ३ | गणेशनगर | ६,४७,४८,४९,५०,५१,१, | २००x५०x२.५० | १ | १७६६ |
| ४ | वझर बु | ४६६,४६७,४६८,४६९,४७०,४७५,४७६,४७७,४८० | २५०x५०x२.०० | १.२५ | ३०००० |
| ५ | पिंपळगाव गायके | ३००,३०१,३०२,३०३,३०४,३१३,३१५,३१६ | ४४०x२५x२.५० | १.१० | १९४३ |

**तालुका गंगाखेड -**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र हे. | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | आनंदवाडी अंतर्गत महातपुरी | २६८, २७०, २७१, २७२, | ७००x६०x०.५० | ४. २५ | ६१०० |
| २ | महातपुरी | ४, ६, ७, ९, १०, ११, १२, १५, १६, १७, १८ | ४३०x४८x०.५० | २.०६ | ३६०० |
| ३ | गौडगांव | ५५ ते ५९, ६१ | ५००x४०x०.५० | २.० | ३५३४ |
| ४ | चिंच टाकळी | ४० ते ४३, ५० ते ५२, ४५, ४६, ४९ | ६५०x४८x०.५० | ३.१२ | ५५१२ |
| ५ | मुळी | ३९९, ४०१, ४०२, २०५, २०६, २०९, ४१०, ४१३, ४१४, ४१५, ४१७, ४२३ | ३०५x४०x०.५० | १.२२ | २१५५ |
| ६ | धारखेड | १४ ते १६, ८ ते ११ | ४१५x४०x०.५० | १.६६ | २९०० |
| ७ | झोला | ९ ते १२, १४, १५ | ४५७x४०x०.५० | १.८३ | ३२३० |
| ८ | मसला | ५१, ५२, ५६, ५७, ६४ | ६७५x४४x०.५० | २.९७ | ५२४७ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | नागठाणा | ११०, ११३, ११५, ११८, १२३, १३३, १३४, १५३, १५५, | ५६५x४९x०.५० | २.७८ | ४८९१ |

**तालुका सेलु-**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र हे. | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | खादगांव | १६, १७, १८ | २५०x५५x२.१० | १.३७ | ३५४ |
| २ | सोन्ना | १५५, १५८ | ३००x४०x२.१५ | १.२० | ५३१ |
| ३ | दिग्रस बु. | १,२,३,४,५,१०,१५ | ५००x२०x२.१० | १ | ८३३ |
| ५ | आंबेगाव दिगर | ८३,८४,८७,८८,८९ | २५०x४०x२.३० | १ | १०६२ |

**तालुका पालम -**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र हे. | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | रहाटी | २२, २३, २४, २५, २६, २७, २८ | ५००x५०x२.५० | २.०० | ४००० |
| २ | फळा | १, ८१, ८६, ८८, ८९, ११० | ३६०x३०x२.५० | १.०८ | १०००० |
| ३ | रावराजुर | १, ९, १०, ११, २२, २३, २८, २९, ३० | ४९०x१००x२.५० | ४.९० | ४३०० |
| ४ | धनेवाडी | २३, २४, २९, १, २, ३, ४, ५, | ५००x८०x२.५० | ४ | २९० |
| ५ | आरखेड | ४४५, ४४६, ४५०, ४५२ | ४००x१००x२.५० | ४ | ४००० |
| ६ | फरकंडा | २९, २८, २७, २४, २३ | ५००x३०x२.५० | १.५० | ५४०० |
| ७ | बरबडी | ३,४,५ | ३५०x३०x२.५० | १.०५ | ३१०० |
| ८ | सावंगी थडी | १,२, ७, ८, २२ | ४००x४०x२.५० | १.६० | ७००० |
| ९ | पिंपळगाव मु. | ९४,९५,९८ | ४००x६०x२.५० | २.४० | ७००० |
| १० | सावंगी भु. | १०० ते १०४, १०६ ते ११०, ११९, १२१ ते १२३, १३२ | ५००x१००x२.५० | ५ | ६६०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११ | गुंज | ४४, ४५, ५०, ५१, ५२, १,९, १०, ११, १९, २७, २८ | ८००x५०x२.५० | ४ | ५००० |
| १२ | भोगांव | ७, ९, १०, ११, २२, २३, २८, २९, ३० | ५००x५०x२.५० | २.५० | ४००० |
| १३ | दुटका | १, २, ३, ५, ६, ७, १०, ११, १२, १६, १७, ३१, ३२, ३५, ३६, | १०००x५०x२.५० | ५ | ८००० |

**तालुका सोनपेठ -**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र हे. | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | खडका/मोहळा | ४, ५, ६, १, २३, २०, १९, १७, १६ | ७५०x४०x२.७५ | ३ | ७९५१ |
| २ | लासिना | २६०, २६२, २६३, २६४, २७०, २७१, २७९, २७५, २७८, २७९, ३००, १, २, ५, ६, ७, ८, १३, १५, ३७, ५१, ५२, ५४ | ९५०x३०x२.५० | २.८५ | ५०३५ |
| ३ | थडी पिंपळगाव | १, ६, १५, १७, १८, १९, १३१, १३२, १३३, १३४, १३५, १३६, १३७, १२९, १३०, १२६, १५८, १४१, १४०, १४६ | ५००x९०x२.५० | ४.५० | ७९५१ |

**तालुका पाथरी -**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र हे. | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | डाकु पिंपरी | १४५, १४४, १४१, १४०, | ५००x४०x१.०० | २ | ७५०० |

सदर माहिती सीडीमध्ये रेकॉर्डींग करण्यात आली असून संक्षिप्तमध्ये इतिवृत्तांतात नोंद करण्यात येत आहे.

प्रस्तावित प्रकल्पा विषयीचे सादरीकरण झाल्यानंतर श्रीपाद कुलकर्णी, समन्वयक यांनी नमुद केले कि, आपल्या काही लेखी, तोंडी सुचना व आक्षेप असतील तर त्या मांडाव्यात जेणेकरुन पर्यावरण विषयक जनसुनावणीच्या इतिवृत्तात त्याची नोंद घेणे शक्य होईल. तसेच प्रथम आपण आपले नांव, गावाचे नाव सांगावे नंतर आपले काय म्हणणे आहे ते या ठिकाणी नोंदवावे अशी विनंती केली.

सदर जाहीर लोकसुनावणी दरम्यान सहभागी लोकांनी प्रश्न उपस्थित केले ते खालील प्रमाणे आहेत.

**बालासाहेब खोपे, गुंज खुर्द, ता. पाथरी, जि. परभणी**

नदीपात्रातील रेती उत्खनन करणे पर्यावरणाशी निगडीत आहेत काय? रेती उपसा करणारे लोक रेती उपसा करतात पण पर्यावरणाकडे लक्ष देत नाही, पर्यावरणाची व्यवस्था होत नाही, झाडे लावणे, तसेच नियमांची अमंलबजावणी होत नाही.

**जिल्हा खनिकर्म आधिकारी, श्री सुरेश घोळवे** यांनी सांगीतले की,

प्रस्तावित रेती घाटास पर्यावरण विभागाने पर्यावरण अनुमती दिल्यानंतर निवीदाप्रक्रीयेनंतर प्रत्यक्ष जेव्हा रेती उपसा करण्यात येइल त्या कालावधीत पर्यावरण संतुलन राहण्यासाठी एक किलोमीटरपर्यंत पाणी शिंपले जाईल तसेच वाळु वाहतुक होणा-या रस्त्यावर दोनही बाजुस वृक्षारोपन केले जाईल. पर्यावरण विभागाने दिलेल्या पर्यावरण अनुमतीमधील पर्यावरण विषयक नियमांची पुर्तता करण्यात येईल.

**दिंगबर निवृती कदम, थडी पिंपळगांव, ता. सोनपेठ जि. परभणी**

थडी पिंपळगांव ग्राम पंचायतीने नदीपात्रातुन रेती उत्खनन करण्यासाठी झालेल्या ग्रामसभेत ठरावास नकार दिला होता तरी तो घाट लिलावास ठेवण्यात आला आहे. तसेच या गावात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही, पाणीपुरवठा विहीर नदीपात्रात आहे रेतीउत्खननास सुरुवात झाल्यानंतर पिण्याच्या पाण्याची समस्या व विषय गंभीर होईल. गावाचा रस्ता वाळु वाहतुक करणा-या वाहनामुळे खराब होतो रेतीउत्खननास सुरुवात झाल्यानंतर रस्ता खराब होत असल्याने शाळेतील मुले, विवीध प्रकारचे रुग्ण यांच्या प्रवासाच्या अडचणी वाढतात. आता कुठे रस्ता व्यवस्थित झाला आहे, तरी प्रशासनास कळकळीची विनंती करण्यात येते की आमच्या गावाच्या हददीतील वाळुघाटाची लिलावप्रक्रीया रदद करण्यात यावी.

**जिल्हा खनिकर्म आधिकारी, श्री सुरेश घोळवे** यांनी सांगीतले की,

प्रस्तावित वाळुघाटासाठी ग्रामपंचयातीचे ठरावपत्र घेतले होते ज्या ग्रामपंचयातीने नकार दिला होता त्याठीकाणी शासनाच्या तरतुदीनुसार संबधित उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामसभा घेवुन पुन:श्च ठराव मागवुन घेतलेला आहे व त्यानुसार घाट समाविष्ट करण्यात आलेला आहे तसेच आपले काही म्हणणे असेल तर आपण जिल्हाधिकारी कार्यालयास/जिल्हाखनिकर्म विभागास लेखी तक्रार/निवेदन दयावे तसेच रस्ता, पाणिपुरवठा

दवाखाना इत्यादी सुविधेबाबत जिल्हा खनिज प्रतिष्ठाण निधीमधुन कामे करता येतात आपण निधीची मागणी लेखी स्वरुपात दयावी तहसिल कार्यालयामार्फत व तांत्रिक समितीमार्फत सर्व बाबींची तपासणी करुन पुढील निर्णय घेण्यात येईल.

**किशन देशमुख, ग्रामसेवक, मोहळा, ता. सोनपेठ जि. परभणी**
रेती लिलावानंतर वाळु वाहतुकीसाठी गावातील रस्त्याचा वापर होवु नये, रस्त्याचे काम नविनच झाले असल्यामुळे पर्यायी रस्त्याचा वापर व्हावा किंवा शिवरस्त्याचा वापर व्हावा हि गावक-यांची मागणी आहे.
**जिल्हा खनिकर्म आधिकारी, श्री सुरेश घोळवे** यांनी सांगीतले की,
आपले काही म्हणणे असेल तर आपण जिल्हाधिकारी कार्यालयास/जिल्हाखनिकर्म विभागास लेखी तक्रार/निवेदन दयावे म्हणजे पर्यायी रस्ता शोधता येईल.
**जिल्हाधिकारी, परभणी** यांनी सांगितले कि,
रेती लिलावानंतर वाळु वाहतुकीसाठी वाहनांना शिवरस्ता किंवा पर्यायी रास्ता उपलब्ध करुन दिला जाईल. लिलाव प्रक्रीयेनंतर वाळु वाहतुक गावातील रस्त्यावरुन होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल.

**रामकिशन धोत्रे, कार्यकर्ता, संकल्प विकास संस्था, गुंज खुर्द, ता. पाथरी जि. परभणी.**
मौजे गुंज खुर्द येथील वाळु उपसा अवैध रीतीने होत असुन हजारो ब्रास वाळु उपसा होत आहे परंतु तेथे कुणीच लक्ष देत नाही सदयस्थितीत वाळु लिलाव झाला नाहि तर यावर आपले काय म्हणणे आहे. रात्रीच्यावेळी होत असलेला अवैध वाळुउपसा व वाहतुक यामुळे ग्रामस्थांना रात्रीचे झोप येत नाही तसे लेखी निवेदन व पत्र दिले आहे.

**जिल्हा खनिकर्म आधिकारी, श्री सुरेश घोळवे** यांनी सांगीतले की,
अवैध रीतीने जो वाळु उपसा होतो तो थांबविण्यासाठीच ही प्रक्रीया राबविली जात आहे. लवकरात लवकर लिलाव प्रक्रीया व्हावी त्या साठीच हि लोकसुनावणी आयोजित केलेली आहे. पर्यावरणविषयक लोकसुनावणी झाल्यानंतर पर्यावरण विभागाची मंजुरी मिळाल्यानंतर जितके लवकर होईल लिलावांना मंजुरी देण्याची कार्यवाही करु म्हणजे काय होईल परभणी जिल्हयात ५८ रेतीघाट अधिकृतरीत्या सुरु झाले की, इतर जे गैरप्रकार आहेत ते कमी होतील आणि जिल्हाधिकारी कार्यालयाचे पथक आणि तालुकास्तरीय पथक यांच्यामार्फत जिल्हयात सगळीकडे कारवाई चालु आहे कुठे आपणास अवैधरीत्या उपसा चालु असल्यास आमच्याकडे तक्रार दया जिल्हाधिकारी कार्यालयाकडे टिम तयार आहे ती पाठविता येईल. या उपरांतक आपले काही तक्रार असल्यास आपण लेखी दयावे आणि पत्र दिले असेल तर त्यानुसार पथक पाठविण्यात येईल.

**गोविंद बाबासाहेब मगर, सरपंच, सोन्ना** ता. सेलु जि. परभणी.
सन २०२१-२०२२ मध्ये आमच्या गावातील रेती घाटाचा लिलाव झालेला आहे आणखी दुस-या घाटाचा लिलावप्रक्रीया चालु करण्यसास ज्या हरकती मागविण्यात आल्या आहेत त्यात आमची लिलावास करण्यास काही हरकत नाही पण लिलाव झालयानंतर वाळु वाहतुकीस गावातील रस्त्याचा किंवा पाटीपासुन गावापर्यत रस्त्याचे काम चालु होणार आहे तरी होत असलेल्या रस्त्याचा वापर न करता आंबेगाव शिवार, गोगलेगाव शिवार किंवा शिवशिवार या पर्यायी रस्त्याची वापर करावा. मागिल वर्षी सन २०२१-२०२२ झालेल्या घाटाच्या लिलावाच्या कुठलाही प्रकारचा निधाी जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन मिळालेला नाही ग्रामपंचायतीस ग्रामपंयातीच्या विकासाठी निधी देण्यात यावा व आमची लिलावास करण्यास काही हरकत नाही.

**जिल्हाधिकारी साहेब यांनी सांगितले की,**
DMF मध्ये जी रक्कम जमा झाली होती ती रक्कम कमी होती आणि लोकप्रतिनिधीकडुन मागणी प्रचंड होती त्यामुळे हयाबाबत जिल्हास्तरीय बैठक घेवुन निधी आणि योजनांचा संपुर्ण प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे निधी आपल्याकडे आहे परंतु त्याचे वितरण कशा पदधतीने करायचे याबाबत शासनाकडुन मंजुरी आल्यानंतर शक्यतो लवकरात लवकर निधी वितरित केला जाईल.

**विठठल साळवे, कार्यकर्ता, संकल्प विकास संस्था, गुंज खुर्द, ता. पाथरी जि. परभणी.**
परभणी जिल्हयात जो ५८ रेती घाटाचा जनसुनावणीचा कार्यक्रम आयोजित केला आहे त्यामध्ये सर्व निकष शासनाने आपल्या पदधतीने लावलेले आहेत जसे कि, फावडे, कुदळ, टोपले इत्यादी साधनांचा वापर करुन रेती उपसा केली जाईल पण आम्ही आतापर्यंत जे लिलाव झालेले वाळु घाट आहेत व रेती उत्खनन कलेले आहे त्याठीकाणी फावडे, कुदळ, टोपले इत्यादी साधनांचा वापर करुन रेती उपसा केला जात नाही किंवा असे काही दिसुन येत नाही जेसीबीचा वापर होतो व रात्रभर जेसीबीने वाळु उपसा केला जातो ज्या ठिकाणी नदी पात्र कोरडे आहे त्या ठिकाणी आपल्या निकषाप्रमाणे त्याठीकाणी फावडे, कुदळ, टोपले इत्यादी साधनांचा वापर करुन रेती उपसा केला जाईल पण ज्या ठिकाणी नदीपात्राात पाणी आहे त्या ठिाकणी बोटीद्वारे पाण्यातुन वाळु उपसा करतात तसेच आपल्या निकषाप्रमाणे वाळु वाहतुक करताना अच्छादीत करुन न्यायची आहे पण तसे काही आतापर्यत दिसुन आले नाही ट्रक्टर/वाहनाद्वारे वाहतूक करताना वाळु उघडीच नेली जाते. ज्या वाळुघाटाची यापुर्वी लिलाव प्रक्रीया झालेली आहे त्याठिकाणी पर्यावरणचा समतोल राखण्यासाठी झाडे लावणे अपेक्षित आहे पण वाळु वाहतुकीसाठी झाडे तोडून वाहतूक केली जाते म्हणून आपण सादरीकरणात सादर केलेल्या सर्व निकषांची जरी अंमलबजावणी झाली नाही तरी दोन ते तीन नियमांची तरी अंमलबजावणी झाली तरी या जनसुनावणला ख-या अर्थाने न्याय मिळेल.

**जिल्हाधिकारी साहेब यांनी सांगितले की,**

सुर्यास्तानंतर वाळु उत्खनन करण्यास परवानगी नाही तरी त्यावर नियंत्रण मिळविण्यासाठी गाव पातळीवर दक्षता समित्या तयार करण्याचे आम्ही निर्णय घेतोय तलाठी व मंडळ अधिकारी यांच्याकडे एकापेक्षा अधिक गाव असतील तर त्यावेळेस अवैध उपसा वाळु उत्खननावर ग्राम दक्षता समित्यांमार्फत नियंत्रण ठेवले जाईल या समित्यामध्ये सरपंच, पोलीस पाटील, ग्रामस्थ इत्यादी असतील जेणेकरुन तात्काळ कारवाई करुन नियंत्रण ठेवतील अन्यथा रात्री वाळुची चोरी होतच राहील. आमचे पथक रात्रंदिवस फिरत असते पण जिल्हयाचा विस्तार आणि नदीपात्राचा विस्तार पाहता एक तलाठी किंवा तहसिलदार एकाचवेळी अनेक ठिकाणी जावु शकत नाही त्यामुळे गाव पातळीवर दक्षता समित्या तयार करण्याचे आम्ही निर्णय घेतोय जेणेकरुन सुर्यास्तानंतर वाळु उत्खननावर नियंत्रण मिळविता येईल त्यास गावक-यांनी सहकार्य करावे जेणेकरुन अवैध वाळु उत्खनन थांबविण्यासाठी मदत होईल.

**माणिक शेषराव कदम, थडी पिंपळगाव, ता. सोनपेठ जि. परभणी.**

ग्रामपंचायत ठरवाशिवाय वाळुलिलाव करता येतो काय? आमच्या ग्रामसभेने लिलाव करु नये असा ठराव केलेला आहे. तरीपण् या वाळुघाटाच्या लिलावप्रकीयेत सादरीकरणात थडी पिंपळगावचे नाव आलेल आहे.

**जिल्हा खनिकर्म आधिकारी, श्री सुरेश घोळवे** यांनी सांगीतले की,

प्रस्तावित वाळुघाटासाठी ग्रामपंचयातीचे ठरावपत्र घेतले होते ज्या ग्रामपंचयातीने नकार दिला होता त्याठीकाणी शासनाच्या तरतुदीनुसार संबधित उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामसभा घेवुन पुन:श्च ठराव मागवुन घेतलेला आहे व त्यानुसार घाट समाविष्ट करण्यात आलेला आहे तसेच आपले काही म्हणणे असेल तर आपण जिल्हाधिकारी कार्यालयास/जिल्हाखनिकर्म विभागास लेखी तक्रार/निवेदन दयावे आम्ही तपासणी करुन पुढचा निर्णय घेवु.

**सरपंच, मोहळा ता. सोनपेठ जि. परभणी यांनी सांगितले की,**

मैराळ सावंगी ता. गंगाखेड या गावच्या हददीतील रेतीघाट लिलाव झालेला आहे पण आमच्या गावातील नदीपात्रातुन रेती उपसा केला जातो त्यामुळे मैराळ सावंगी व मोहळा या वाळुघाटाची हद्द निश्चित करावी.

**जिल्हाधिकारी साहेब यांनी सांगितले की,**

टिम पाठवून हद्द निश्चित केली जाईल आपण लेखी अर्ज द्यावा कार्यवाही होईल.

**नंदकुमार माणिकराव चौधरी, सरपंच, वांगी, ता. मानवत जि. परभणी**
नियमावली ग्रामपंचायतीत हददीत रेतीचा साठा कुठे राहील सरकारी खाजगी राहील हे सांगता येत नाही आज जे नियम आपण सांगतात ते उदया आमच्या लक्षात राहत नाही तरी आपण नियमावली ग्रामपंचायतीस दयावी. वाळुचा साठा कुठे करण्यात येईल. तसेच वाळु उत्खनन करताना नदीपात्राच्या खोलीची तपासणी करत नाहित कि, लिलावधारकाने किती खोलीपर्यंत उत्खनन केलेले आहे.

**उपप्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ, परभणी यांनी सांगितले की,**
याबाबत आपणांस सांगण्यात येते कि, सादरीकरण् केलेला पर्यावरण व्यवस्थापन योजना व मराठी व इंग्रजीमध्ये असलेला कार्यकारी सारांशाची प्रत संबधीत ग्रामपंचायतीना सुनावणीच्या एक महिना अगोदर दिलेली आहे.
तसेच **जिल्हा खनिकर्म आधिकारी, श्री सुरेश घोळवे** यांनी सांगीतले की,
संबधित ग्रामपंचायतीच्या हददीत रेतीसाठा उपलब्धतेनुसार खाजगी किंवा सरकारी जागेत राहील तसेच उपलब्ध असलेल्या साठयानुसार लिलावाची प्रक्रीया होईल. पर्यावरण अनुमतीची एक प्रत ग्रामपंचयातीस देण्यात येईल. तसेच किती खोलीपर्यंत कसे उत्खनन केले आहे याकरीता जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत एक अभियंता व पथक दर आठवड्याला तपासणी करेल.

**व्यंकट गिते, सरपंच डाकुपिंपरी, ता. पाथरी जि. परभणी**
मागिल वर्षी सन २०२१-२०२२ झालेल्या घाटाच्या लिलावाच्या कुठलाही प्रकारचा निधी जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन मिळालेला नाही निधीसाठी प्रस्ताव देण्यात आला आहे.
**जिल्हाधिकारी साहेब यांनी सांगितले की,**
DMF मध्ये जी रक्कम जमा झाली होती ती रक्कम कमी होती आणि लोकप्रतिनिधीकडुन मागणी प्रचंड होती त्यामुळे हयाबाबत जिल्हास्तरीय बैठक घेवुन निधी आणि योजनांचा संपुर्ण प्रस्ताव शासनाकडे पाठविला शासनाकडुन मंजुरी आल्यानंतर शक्यतो लवकरात लवकर निधी वितरित केला जाईल. सर्वांचे म्हणेन सादर झाल्याचे दिसते समारोप करावा.

**उपप्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ, परभणी यांनी सांगितले की,**
वृत्तपत्रात दिलेल्या जाहिरातीनुसार व्ही. सुनंदा रेडडी, नलगोंडा, तेलंगना यांचे लेखी निवेदन उपप्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ, परभणी या कार्यालयास मिळालेले आहे.

श्रीपाद कुलकर्णी, यांनी उपस्थितांना विचारले की, आणखी कोणाला काही सुचना, आक्षेप मांडावयाचे असतील तर ते मांडू शकतात. परंतु सहभागीमधून कुठलीही सुचना टीप्पणी नसल्यामुळे सदर सुनावणीचे समन्वयक यांनी संबंधितांचे आभार मानले व अध्यक्ष्यांच्या परवानगीने लोकसुनावणीचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

**(श्री श्रीपाद रा. कुलकर्णी)**
संयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण
नियंत्रण मंडळ, परभणी

**(श्री सुजीत ढोलम)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण
नियंत्रण मंडळ,
छत्रपती संभाजीनगर

**(श्री रघुनाथ गावडे)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
जिल्हा दंडाधिकारी, परभणी